**।। जय बाबाजी ।।** **|| जय महात्माजी॥**

**(श्री)**

**ऋग्वेद**

**ॐ मृत्युंजयाय रुद्राय निलकंठाय शंभवे ।**
**अमृतेशाय शर्वाय महादेवाय ते नमः ||१||**

अर्थ - मृत्युंजय, रुद्र, निलकंठ, शंभू, अमृतेश, शर्वाय महादेवास नमस्कार असो.

**चंद्रकांत (अष्टनाम)**

**अच्युतः केशवो विष्णुहरी: सत्यं जनार्दनः ।**
**हंसो नारायणश्चैमेतन्नामाष्टक शुभम् ।।१।।**

अर्थ - मंगल (शुभ) रुप प्रभूची पुढील आठच नावे आहेत :- अच्युत, केशव, विष्णु, हरी, सत्य, जनार्दन हंस आणि नारायण

**केशवं क्लेशनाशाय दुःखनाशायमाधवं ।**
**श्रीहरिपापनाशाय गोविंद मोक्षदायकम् ।।२।।**

अर्थ - केशव क्लेशनाशासाठी, माधव दुःख नाशासाठी, श्रीहरी पापनाशासाठी, व गोविंद (विष्णु) मोक्ष देण्यासाठी आहे.

**ध्यानमूलं गुरोर्मुर्तिः पूजामूलं गुरोः पादं ।**
**मंत्रमूलं गुरोर्वाक्यं मोक्षमूलं गुरुकृपा ।।३।।**

अर्थ - गुरुमुर्ति ही ध्यानाचे मुळ आहे. गुरुपाद हे पुजेचे मुळ आहे. गुरुकृपा ही मोक्षाचे मुळ आहे.

**पुजा सत्यं मंत्र सत्यं सत्यं देवं निरंजनम् ।**
**गुरुवाक्यं सदा सत्यं सत्यं एकं परं पदम् ॥४॥**

अर्थ - पूजा ही सत्य आहे. मंत्रही सत्य आहे. देव निरंजनही सत्य आहे. गुरु वाक्य हे नेहमी सत्य आहे आणि तेच श्रेष्ठ आहे.

**अन्यथः शरणं नास्ति त्वमेव शरणं मम् ।**
**तस्मात्कारुण्यभावेन रक्ष रक्ष महेश्वर ||५||**

अर्थ - (हे देवा) मी फक्त तुलाच शरण येतो तुझ्याशिवाय मला कोणीही तारणार नाही. म्हणून हे प्रभो, कारुण्यभावनेने माझे रक्षण कर.

**।।गायत्री।।**

**ॐ नमो ब्रह्मः । ॐ नमो शिव गायत्री:।**
**ॐ नमो महा गायत्रीः । ॐ नमो कपिला गायत्री:।**
**ॐ नमो रुद्र गायत्री:। ॐ नमो राम गायत्री:।**
**ॐ नमो हनुमान गायत्री:। ॐ नमो चंडी गायत्री:।**
**।ॐ नमो आनंदी गायत्रीः।ॐ नमो मुळ गायत्री:।**
**ॐ नमो पिठस्वरुपे । ॐ नमो शक्र गायत्री**
**ॐ नमो विश्वामित्र गायत्रीः। ॐ नमोजीपत्री:।**
**ॐ नमोजी दशश्वरे:। ॐ नमो विद्या बिजेः।**
**ॐ नमो शुध्द गायत्री। ॐ नमो आदिबीजे:।**
**ॐ नमो विनायके:।ॐ नमो रक्तांक्षीः।**
**ॐ नमो कामाक्षीः।ॐ नमो बीजांक्षी: ।**
**ॐ नमो स्वयंप्रकाशीः। ॐ नमो अनादि गायत्री:।**

**ॐ बीज**

**क्रं क्रां क्रीं क्रू क्रों। न्हं न्हां न्हीं न्हुं न्हों**
**क्लं क्लां क्लीं क्लुं क्लों। त्रं त्रां त्रीं त्रु त्रों**
**ब्र ब्रां ब्रीं बुं ब्रों। क्ष क्षां क्षीं क्षं क्षों।**
**ल्हं ल्हां ल्ही ल्हुं ल्हों। थं थां थीं थुं थों।**
**प्रं प्रां प्रीं प्रुं प्रों। न्हं न्हां न्हीं न्हं न्हों।**
**रं रां रीं रुं रों। द्रं द्रां द्रीं द्रुं द्रों।**
**ग्रं ग्रां ग्रीं ग्रुं गों। श्लं श्लां श्ली श्लुं श्लों ।**
**शं शां शी शुं शों। ध्लं ध्लां ध्लीं ध्लुं ध्लों।**

घ्रं घ्रां घ्रीं घ्रुं घ्रों। ष्लं प्लां ष्लीं ष्लुं ष्लों।
स्त्रं स्त्रां स्त्री स्त्रुं स्त्रों। च्लं च्लां च्ली च्लुं च्लो ।
भ्रं भ्रां भ्रीं भ्रुं भ्रों। घ्नं घ्नां घ्नीं घ्नुं घ्नों।
ज्लं ज्लां ज्लीं ज्लुं ज्लों। वं वां वीं वों।

## न्यास

ॐ क्रौं ॐ हौं अंगुष्ठाय नमः। ॐ क्रौं तर्जनीभ्यां नमः।
ॐ हाँ जाँ मध्यमाभ्यां नमः।
ॐन्हौं ब्रौं अनामिकाभ्यां नमः।
ॐ न्हौं कनिष्ठाकाभ्यां नमः। ॐ स्त्रौं न्हौं नेत्राय नमः।
ॐ क्रौं शिखायै वषट्। ॐ त्रौं क्रौं पादत्रयाय नमः।
ॐ स्त्रौं द्रौं मुखाय नमः। ॐ क्रौं हृदयाय नमः ।
ॐ बौं क्राँ बाहुभ्यां नमः। ॐन्हौं कण्ठाय नमः।
ॐ त्रौं ब्रौं कटिभ्यां नमः। ॐ क्राँ जंघाभ्यां नमः।
ॐ मुखाय नमः। ॐ लौं पौष्टीय नमः।
ॐ भृकुटयै नमः। ॐन्हस्वाय नमः।
ॐदीर्याय नमः। ॐ श्रीं न्हीं ललाटाय नमः।
ॐ लौं क्रौं त्रौं न्हाँ पूर्णाय नमः। ॐ प्रथमाय नमः।

## मातृका

ॐ लं नमः। ॐ सं नमः। ॐ ढं नमः। ॐ रं नमः।
ॐ चं नमः। ॐ शं नमः। ॐ ठं नमः। ॐ घं नमः।
ॐ हं नमः। ॐ गं नमः। ॐ चं नमः। ॐ छं नमः।
ॐ क्षं नमः। ॐ कं नमः। ॐ जं नमः। ॐ झं नमः।
ॐ उं नमः। ॐ थं नमः। ॐ ठं नमः। ॐ तं नमः।
ॐ ज्ञं नमः। ॐ दं नमः। ॐ वं नमः। ॐ अं नमः।

**ॐ तत्सत् श्रीकृष्ण प्रसन्न**

**अथ तत्रागमद् ब्रह्मा, भवान्य च सम्भवः ।**
**महेंद्र प्रमुखा देवा, मुनय : सप्रजेश्वराः ||१||**
**पितरः सिध्दगंधर्वा, विद्याधरमहोरगाः ।**
**चारणा यक्षरक्षांसि, किन्नराप्सरसो व्दिजाः ||२||**

अर्थ - शुकाचार्य म्हणतात, हे परीक्षीती ! श्रीकृष्ण निजधामाला निघाले तेव्हां विमानांच्या पंक्तीने देव हे आपल्या सर्व गणांसहवर्तमानात आले. १. सनकादिक मुनींच्या पंक्ति, यक्ष प्रजापती, अर्यमादिकरुन पितर, कपिलादि गंधर्व व विद्याधर, यक्ष, चारण, किन्नर, विभीषण, महारग (मोठाले नाग), व्दिज (दत्तात्रय इ.) नारद, गरुडपक्षी, रंभा, उर्वशी, मेनका सारख्या अप्सरा असा समुदाय येथे जमा झाला. २.

**द्रष्टुकामा भगवतो निर्वाणं परमोत्सुकाः।**
**गायन्तश्च, गुणन्तश्च, शौरे कर्मणि जन्मच ।।३।।**

अर्थ - पुढे आम्हाला कृष्णाचे दर्शन कोठून होणार ! म्हणून कृष्णाचे निर्याण कालांचे दर्शन घेण्याविषयी अत्यंत उत्कंठीत होऊन सारे देव त्वरेने आले होते. तो कृष्ण निजधामाला गेल्यानंतर मग आम्हाला दर्शन कोठून ! म्हणून कोणी श्रीकृष्णाच्या कृत्याचे वर्णन करीत, कोणी कृष्णचरित्र्याचे गीत गात, असे सर्व मिळून दर्शनास्तव आले होते. ३.

**ववृषुःपुष्पवर्षाणि, विमानावलिभिनर्भः ।**
**कुर्वन्तः सङ्कुलं राजन् भक्त्या परमया युतः ।।४।।**

अर्थ - आकाशामध्ये चारही बाजूंनी विमानांच्या पंक्ति अगदी दाटून गेल्या त्यातील देवांनी श्रीकृष्णाला पाहताच मोठ्याने जयजयकार केला आणि सर्वांनी मिळून एकदम दिव्य पुष्पवृष्टि केली त्यावेळी श्रीकृष्णाच्या चारही बाजुंनी दिव्य सुमनांचा सडा पडला त्यामुळे श्रीकृष्ण फारच शोभिवंत दिसू लागला. ४.

**भगवान पितामहं विक्ष्य, विभूतीरात्मनो विभुः ।**
**संयोज्यात्मनि चात्मानं पद्मनेत्रे न्यमिलयत् ।।५।।**

अर्थ - सारे देव त्वरेने तेथे जमा झाले तेव्हा समोरच उभा राहिलेला ब्रह्मदेव श्रीकृष्णाच्या दृष्टीस पडला आणि आपल्यासारखी विभूती जो शंकर त्यालाही श्रीकृष्णाने पाहिले तसेच इंद्रादिक देव ज्या आपल्याच विभूती त्यांना पाहुन श्रीकृष्णाने आपले पदापत्रासारखे नेत्र सहज मिटल्यासारखे केले.

**लोकाभिरामा स्वतनुं धारणाध्यानमग्डलम् ।**
**योगधारणयाऽग्नेय्याऽ दग्ध्वा धामा विश्वत्स्वकम् ।।६।।**

अर्थ - योगीलोक कळिकाळालाहि जिंकून इच्छामरणी होतात ते पूर्णपणे अग्निधारणा करुन आपला देह जाळून स्वरुपाला मिळतात जसे थिजलेले तुप विरघळते त्याप्रमाणे सगुण होते ते निर्गुणत्वाला आले. ह्यालाच योगाग्निधारण म्हटले आहे म्हणून श्रीकृष्णाने देह दग्ध केला असे कदापि घडणार नाही.

**दिवि दुन्दुभयो नेदुः, पेतुः सुमनश्च खात् ।**
**सत्यं धर्मो धृति मेः कीर्तिः श्रीश्चानु तं ययुः ।।७।।**

अर्थ - देव मोठे आनंदीत झाले. त्यांनी दिव्य दुंदुभी वाजविण्यास सुरुवात केली आणि आकाशातून दिव्य पुष्पाचा कृष्णावर वर्षाव केला. देव मोठे आश्चर्य करीत आहेत तोच सत्य, धर्म, धृति, कीती ह्या देवताहि लक्ष्मीसह वर्तमान पृथ्वीला सोडून कृष्णाकडे लक्ष लावून निघून गेल्या.

**देवादयो ब्रह्ममुख्या, न विशन्तं स्वधामनि ।**
**अविज्ञातगति कृष्णं ददृशुश्चतिविस्मिताः ॥८॥**

अर्थ - इंद्र, बृहस्पती व मुखत्वेकरून ब्रह्मदेव, ह्या (सर्वांना) देवांना अत्यंत भ्रमात पाडून निजधामात प्रवेश केला. श्रीकृष्णाची अतर्क्य गति, ती देवांनाही आपल्या सामर्थ्याने कळली नाही; म्हणून ते मनामध्ये आश्चर्यचकित होऊन आपापल्या स्थानी निघाले.

**सौदामन्या यथाऽऽकाशे, यान्त्याहित्वाऽभ्रमण्डलम् ।**
**गतिर्न लक्ष्यते मत्वैस्तथा कृष्णस्य दैवतेः ।।९।।**

अर्थ - मेघमंडळात वीज चमकते, ती आली कोठुन आणि गेली कोठे ही तिची गति ज्याप्रमाणे पृथ्वीवरील मनुष्यांना कळत नाही, त्याप्रमाणे कृष्णाची गतिहि देवांना दुर्लभ झाली ! त्याचप्रमाणे कृष्णाची अवतारशक्तीही देवांना निश्चितपणे कळली नाही.

**ब्रह्मरुद्रादयस्ते तु दृष्टवा योगगति हरेः ।**
**विस्मितास्तां प्रशंसन्त: स्वं स्वं लोकं युयस्तदा ।।१०।।**

अर्थ - "आम्ही त्रिभुनात सर्वज्ञ आहो' असा देवांच्या मनात मोठा अभिमान होता. त्यांनी कृष्णाची गती पाहुन त्यांच्या जाणिवेचे पाणीच होऊन गेले ! लाजेने अभिमान पळून गेला ! तेव्हा त्यांनी कृष्णाची स्तुती करण्यास प्रारंभ केला. ते तसेच श्रीकृष्णाची किती वर्णन करीतच आपापल्या लोकाला निघुन गेले.

**राजन्परस्य तनुभृज्जननाप्येहा: मायविडम्बनमवेहि यथा नटस्य ।**
**सृष्टवाऽऽत्मनेदमनुविश्व विहृत्यचान्ते, संहृत्यचात्ममहिमोपरतः स आस्ते ||११||**

अर्थ - राज परीक्षीति, ऐक ! श्रीकृष्ण हा साऱ्या कारणांचे कारण होता. श्रीकृष्ण हा खरोखर मायेचाही चेतनाशक्ति होता ज्याला व्यक्ती नाही आणि वर्णही नाही. ज्याला रुप नाही. आणि गुणही नाही, त्या श्रीकृष्णाने आपल्या लिलेनेच यदुवंशामध्ये अवतार घेतला होता, जो साऱ्या वंशाचा मुळ पुरुष जो गोत्राचा गोत्रज, जो साऱ्या जातींचे जाती, तोच हा श्रीकृष्ण स्वत: सर्वांचे आदिस्थान होय.

**मर्त्येन यो गुरुसुतं यमलोकनितं । त्वां चानयच्छरणद: परमास्त्रदग्धम् ।।**
**जिग्येऽन्तकान्तकमपीशम सावनीश: । किं स्वावने स्वरनयन् मृगयुं सदेहम् ।।१२।।**

अर्थ - श्रीकृष्णाने ह्याच देहाने यमलोकात जाऊन काळ यमाचा निग्रह करुन मेलेल्या गुरुपुत्राला आणले. उत्तरेच्या गर्भात ब्रह्मास्त्राच्या महाशक्तीने तू जळत होतास तशा आकांतामध्येहि आपल्या चक्राने श्रीकृष्णाने तुझे संरक्षण केले. तुझे संरक्षण करण्याचे कारण हेच की तुझी माता त्याला शरण गेली आणि कृष्ण हा शरणागताचा रक्षण करणारा असुन आपल्या भक्ताची संकटे निवारण करणारा आहे.

**तथाऽप्यशेषस्थितिसम्भवाप्य । येष्वन्यहेतुर्यदशेषशक्तीधृक् ।।**
**नैच्छत्प्रणेतुं वपुरत्र शेषितं मर्त्येनकिं स्वस्थगतिं प्रदर्शयन् ।।१३।।**

अर्थ - माया व तिचे सत्वादि तिन्ही गूण या सर्व कारणाचे कारण श्रीकृष्णच (स्वतः) आहे. अनादित्वामुळे त्याला मात्र कोणीही कारण नाही. अनंत कोटी ब्रह्मांडांची उत्पत्ति स्थिती व लय करुनही श्रीकृष्ण अलिप्तच असतो. श्रीकृष्णाच्या ठिकाणी अनेक अद्‌भूत सामर्थ्य होती.

**य एतां प्रातरुत्थाय, कृष्णस्य पदवी पराम् ।**
**प्रयत : कीर्तयेद्भक्त्या, तामेवाप्नोत्य्नुत्तमाम् ।।१४।।**

अर्थ - श्रीकृष्ण अवताराच्या अंती कृष्णाची जी परमगति झाली, तिच अत्यूत्कृष्ट योगस्थिती होय ती देवश्रेष्ठांनाहि खरोखर अतर्क्य आहे. म्हणूनच ज्ञाते लोक वेदशास्त्रामध्ये तिला "परा पदवी" असे म्हणतात म्हणून जो कोणी भक्तियुक्त भावनेने नित्य नेमस्तपणे पठन प्रात:काळी करील, भक्तियुक्त हृदयकमलामध्ये जो ह्या चौदा श्लोकांचा जप करील आणि नित्यनेमाने दररोज प्रात:काळी जो जिव्हाग्रावर ठेवील असा नेम प्राणांतापर्यंत सोडावयाचा नाही तो उत्तमत्वाला पावेल.

**सामवेद**

**।। ॐ श्री गणेशाय नमः ।।**

**महानारायणं देवं सर्वशक्तिमयं प्रभुं ।**
**आदिदेवं जगन्नाथं प्रणमामि मुहुर्मुहुः ||१||**

अर्थ - श्री गणेशाला नमस्कार असो मी सर्व शक्तिमान आदिदेव जगन्नाथ, महानारायण देवास अनेकवार नमस्कार करीत आहे.

**सच्चिदानंदरूपस्य तस्य सर्वगतस्य कै |**
**वेदोऽपीत्यं कथयति प्रभावं परमात्मनः ||२||**

अर्थ - त्या सच्चिदानंदरुपी सर्वगत परमात्म्याच्या प्रभावाला वेदसुध्दा अशा प्रकारे म्हणतो.

**त्रीणि पदाविचक्रमे विष्णुर्गोपा अदाभ्यः ।**
**अतो धर्माणि धारयन् ।।३।।**

अर्थ - अविनाशी गोपाल, महाविष्णुने आपल्या चतुर्थ भागाने ब्रह्माण्डाला धारण करुन त्रिपाद विभुतीस व्याप्त केले.

**तस्य पादे प्रादुरभुद्ब्रह्माण्डं रुपमद्भूतं ।**
**एजतितस्य शक्त्या तदेहस्तस्यैव विश्रुतम् ||४||**

अर्थ - त्याच्या चवथ्या भागात अद्भूतरुपी ब्रह्माण्ड प्रकट झाले. आणि त्याच्या शक्तिने प्रयत्न केला त्याचे ते शरीर विख्यात आहे.

**सर्वभुतनिकेतन्तं बन्धमोक्षपरायणम् । कर्मोपासनाज्ञानानामालयं देवरुपिणम् ||५||**

**नमामि परया भक्त्या दातारं सर्वसम्पदाम् ।**
**वेदो ऽ त्पिथं कथयति स्वरूपं जगदात्मनः ||६||**

अर्थ - सर्व प्राण्यांच्या स्थानबध्द मोक्ष पारायण कर्मोपासना ज्ञानाचे आलय, संपत्तीचा दाता देवरुपाला श्रेष्ठभक्तिने नमस्कार करतो. वेदसुध्दा त्या जगदात्म्याच्या स्वरुपास असे म्हणतो.

**महानारायणो देवो भूतानां रक्षणाय वै ।**
**ब्रहमाविष्णुमहेशानां रुपैः प्रादुर्बभूवह ||७||**

अर्थ - महानारायण देवता प्राण्यांच्या रक्षणासाठी ब्रहमा, विष्णु महेशरुपाने प्रकट झाले.

## सामदेव अथ विनियोग सिध्दान्त

**यैर्महात्माभिर्मात्रार्था ज्ञाता यदा मंत्र जपेन । सिध्दिर्लब्धा त एवं तेषां मंत्रणामृषय आसन ।**
**ऋतेगुरूपदेशान्मन्त्र सिद्धिर्नलभ्यते। विनियोगे तऋषिर्पणनतसिध्दिः सुलभः ।**
**तस्मात् विनियोगे गुरुतर्पणाऋषी संयोगः । पाठे जपे वायच्छत्दोच्यारणमशुध्दं जातं ।**
**तद्दोषपरिहायायैव छंदो देवस्य तर्पणमावश्यकम् । पाठे जपे वामनो स्वेष्टदेव ध्यानादन्यमगच्छति ।**
**तद्दोषशांतये देवतर्पण मावश्चकम् । तस्मात् देवविनियोग कर्तव्यः ।**
**येषु मन्त्रस्वाध्यात्मिकोऽर्थः । कथ्यते तेषु जप पाठ फलस्याभावत्केवलं मनन ।**
**प्रधानत्वाच्च विनियोगस्य प्रयोजनं नास्तिती ।।**

अर्थ - ज्या महात्म्यांनी मंत्रार्थास जाणले किंवा जपाने सिध्दी प्राप्त केली तेच त्या मंत्राचे ऋषी झाले. गुरु उपदेशाशिवाय मंत्र सिध्दी प्राप्त होत नाही. विनियोगात ऋषी तर्पणाने ती सिध्दी सुलभ आहे त्यामुळे विनियोगात गुरुतर्पणासाठी ऋषीचा संयोग आहे. पाठ किंवा जपात जे शुध्दोचारण अशुध्द झाले असेल त्या दोषाच्या निवारणासाठी छंद देवतेचे तर्पन आवश्यक आहे. वाचनात किंवा जप करतांना जर मन आपल्या इष्ट देवतेच्या ध्यानापासून दुसरीकडे गेले तर त्या दोषाच्या शांतीसाठी देवतर्पण आवश्यक आहे. त्यासाठीच विनियोग आवश्यक आहे, ज्या मंत्रात अध्यात्मिक अर्थ सांगितला जातो, त्यात जप पाठाचा अभाव आणि केवळ मनन प्रधानतेत विनियोगाचे कर्तव्य नाही.

## यजुर्वेद

**यथामां वाच कल्याणी मावदानि जनेभ्यः ।**
**ब्रह्म राजन्याभ्यां शुद्राय चार्यायच स्वायचारणायच ।**

अर्थ - ज्या प्रकारे या कल्याणकारी वाणीला आम्ही ब्राह्मण व क्षत्रियांसाठी आणि शुद्रांसाठी तसेच वैश्यांसाठी, आपल्या प्रिय व अप्रिय, इतर तसेच संपूर्ण जनांसाठी उपदेश केला आहे. त्याचप्रकारे मनुष्यांनो ! तुम्हीसुद्‌धा करा.

## भागवत

**विश्वामित्रोऽसित : कण्वो दूर्वास भृगुरंगिराः |**
**कश्पयो वामदेवोऽत्रि वसिष्ठो: नारदादयः ।**

अर्थ - जे तपस्तेजाने दैदिप्यमान, जे पुर्ण ज्ञानाच्या योगाने चैतन्यधन, ज्यांना श्रीकृष्ण निरंतर वंदन करीत असे; ते मोठे मोठे ऋषी पिंडारकास जाण्यास निघाले, गायत्री मंत्रामुळे प्रति सृष्टी करण्यास समर्थ झाला असा जो महाआग्रही विश्वामित्र, जेथे शित उष्ण बाधत नाही, अशा आश्रमामध्ये राहणारा व ज्याच्या नावाने द्‌वंद्‌वे पळत सुटतात असा असित, ज्याने सुर्याला शरण जाऊन त्याच्या घोड्याच्या कानात बसून पूर्ण वेदपठण केले ते कण्वऋषी, अत्याचारी असून निराहारी म्हणून प्रसिध्द असलेला दुर्वासऋषी; ज्या भृगुने मारलेली लाथ, श्रीकृष्ण हृदयावर धरुन ते श्रीवत्स भूषण म्हणून मिरवतो तो भृगुऋषी तसेच ज्याच्या पोटी ब्रहस्पती जन्माला आला असा सृष्टीमध्ये बुध्दीमान अंगिराऋषी, ज्याच्या पोटी सुर, नर किन्नर जन्मास आले असा कश्यपऋषी, सर्व वेदामध्ये ज्याची योग्यता मोठी ते वामदेवऋषी, ज्याच्या पोटी तिन्ही देव जन्माला आले ते अत्रीऋषी, जो श्रीरामाचा सद्‌गुरु ज्याच्या घाटीचा महिमा असा की ज्याने आपल्या तेजाने सुर्यालाही मागे टाकले असे वसिष्ठऋषी आणि देवर्षी नारद असे सर्व मुनीश्रेष्ठ आणि मोठेमोठे ऋषिवर्य सहपरिवार शिष्यसमुदायासह पिंडारकामध्ये गोळा झाले.

**कविर्हरिन्तरिक्षः प्रबुध्द पिप्पलायन: ।**
**आविर्होत्रोऽय, द्रमिलश्चमस: करभाजन: ।**

अर्थ - कवि, हरी, अंतरिक्ष, प्रबुध्द, पिप्पलायन, आविर्होत्र, सुलक्षणी द्रमिल, चमस आणि करभाजन ही ऋषभकुलातील नऊ बंधुची नावे आहेत. ह्या नामांचे स्मरण केले असता सर्व पातकांचा नाश होतो, असा त्यांचा महिमा आहे.

**दुर्लभो मानुष्यो देहो देहिनां क्षणभंगुरः ।**
**तत्रापि दुर्लभं मन्ये वैकुण्ठप्रियदर्शनम् ।**

अर्थ - अहो ! सर्व देहांमध्ये नरदेह हा अत्यंत दुर्मिळ आहे. पुण्य आणि पाप समान व्हावे तेव्हाच हा नरदेह प्राप्त होतो ह्या नरदेहाचा अहंकार धरुन रहावे. तर तो मुळाचाच क्षणभंगुर; येथे भगवंताशी एकरुप झालेले भक्त भेटणे हेच मोठे भाग्य होय, अंगामध्ये निरिच्छता आत्मस्वरुपामध्ये दृष्टी, व कोट्यानुकोटी पुण्ये लागोपाठ उभी राहतात; तेव्हाच हरिप्रियांची भेट होते.

**हंसस्वरुप्यवदद्च्युत आत्मयोगं दत्तः । कुमारऋषभो भगवान पिता नः ।**
**विष्णुः शिवाय जगतां कलयाऽवतीर्णः । स्तेनाऽहृता: मधुभिदा श्रुतयो हयास्ये ।**

अर्थ - ब्रह्मदेवाच्या सनकादिक पुत्रांनी पित्याला प्रश्न केला; तेव्हा हंसावतार घेऊन त्या उत्तराच्या निमित्ताने ब्रह्मज्ञान कथन केले ; नित्य हरिनामाचे स्मरण केले असता महादुर्धर विघ्नं भस्मे होऊन जातात ज्याच्या नामाने यम सुध्दा पळून जातो; ज्याच्या नामाने जन्म मरणाचा नाश होतोः श्रीदत्ताचा अवतार म्हणजे मुर्तिमंत परब्रह्म होय. जे नैष्टिक ब्रह्मचारी; स्वप्नातसुध्दा ज्याचे विर्य पतन होत नाही म्हणून ज्यांना कुमार म्हणतात ते सनकादिकही अवतारमुर्तीच होय तसेच आमचा ज्ञानसंपन्न पिता जो ऋषभनारायण तोही खरोखर भगवंताचाच अवतार होय ह्या वरील नामांनी व रुपांनी अवतार घेणारा तो एक नारायणच होय जगाचा प्रतिपाल करणारा जो श्रीकृष्ण तोच आपल्या अंशाने अवतार घेतो तोच श्रीकृष्ण स्वत: मधुकैटम दैत्याचा संहार करुन मधुसुदन असे नाम पावला हयग्रीवाचा अवतार घेणाराही तोच त्यानेच पुढे शंखासुराला मारुन बुडालेले वेद वर काढून ब्रह्मदेवाच्या हातात दिले ह्या प्रमाणे वेदाचे रक्षणही त्यानेच केले.

**नमस्ते वासुदेवाय नमः संकर्षणाय च । प्रद्युम्नायानिरुध्दाय तुभ्यं भगवते नमः ।**
**नारायणाय ऋषये, पुरुषाय महात्मने । विश्वेश्वराय विश्वाय, सर्व भूतात्मने नमः ।**

अर्थ - वासुदेवा तुला लोटांगण घालतो, संकर्षणा तुला नमन करितो पद्युम्ना तुला प्रणाम करितो, हे अनिरुध्दा तुला अभिवादन करतो त्याचप्रमाणे हे ऋषिश्वरा नारायणा ! हे सुरेद्रा महापुरुषा ! हे विश्वरुपा ! हे विश्वेश्वरा हे महात्मा श्रीवरा ! तुला नमस्कार असो हे सर्वभुतात्मन पुरुषोत्तम ! तुला नमस्कार असो.

**सुर्योऽग्नि ब्राह्मणो गावो वैष्णव: खं मरुज्जलम् ।**
**भूरात्मा सर्व भूतानि भद्रपुजापदानि मे।**

अर्थ - सुर्य अग्नि आणि ब्राह्मण, गाई वैष्णव आणि आकाश, वायू जल आणि पृथ्वी, ही नऊ स्थाने व आपण स्वतः हे दहावे स्थान आपणाला पुज्य आहेत. सर्व पंचमहाभूते हे अकरावे पूज्यस्थान होय.

## चक्षुविद्या

**ॐ चक्षु इंद्रियोंके प्रकाशक भगवान, श्री सूर्यनारायणको नमस्कार है ।**
**ॐ आकाशमे विचारण करनेवाले भगवान, श्री सूर्यनारायणको नमस्कार है ।**
**ॐ महासैना सहस्त्रकिरण भारी सैना साथ रखनेवाले भगवान,**
**श्री सूर्यनारायणको नमस्कार है।**
**ॐ तमोगुणरुपमे भगवान, श्री सूर्यनारायणको नमस्कार है ।**
**ॐ रजोगुणरुपमें भगवान, श्री सूर्यनारायणको नमस्कार है ।**
**ॐ सत्वगुणरुपमें भगवान, श्री सूर्यनारायणको नमस्कार है।**

**हे भगवान् मुझे असत् से सत् के ओर ले चले ।**
**हे भगवान मुझे अंध:कार से प्रकाश की ओर ले चले ।**

## श्री विष्णू पुराण

**नर्मदायै नमः प्रातनर्मदायै नमो निशिः ।**
**नमोऽस्तुते नर्मदे तुभ्यं त्राहि मां विषसर्पतः ।**

## ॥ॐ॥

**परमात्माच भुतात्माच त्वान्माच च्यावेयं ।**
**भवान यथाकथा स्तुती नथी किं अर्थप्रवर्तते ।**

## शिवरक्षा

**ॐ श्री गणेशाय नमः । श्री सांबसदाशिवाय नमः ।**

**अस्य श्री शिवरक्षास्तोत्रमंत्रस्य याज्ञवल्क्य ऋषीः ।**
**श्री सदाशिवो देवता । अनुष्टुप छन्दः ।**
**श्री सदाशिवप्रीत्यर्थ शिवरक्षास्तोत्रं जपे विनियोगः ।।**

अर्थ - श्री गणेशाला नमस्कार असो श्री सांब सदाशिवाला नमस्कार असो. या शिवरक्षास्तोत्र मंत्राचा ऋषी याज्ञवल्क्य देवता सदाशिव, व छंद अनुष्टुप असून श्रीसदाशिवा करिता जप करीत आहे.

**चरितं देवदेवस्य महादेवस्य पावनम् ।**
**अपारं परमोदारं चतुर्वर्गस्य साधनम् ||१||**

अर्थ - देवाधिदेव श्री शंकराचे चरित्र पावन आहे व त्याचा आदि व अंत नाही हे चरित्र अत्यंत कल्याणकारक असून धर्म, अर्थ, काम व मोक्ष असे चार पुरुषार्थ प्राप्त करुन देणारे आहे.

**गौरी विनायकोपेतं पंचवक्त्रं त्रिनेत्रकम् ।**
**शिवं ध्यात्वा दशभुजं शिवरक्षा पठेन्नर : ||२||**

अर्थ - पार्वती व गजानन यांच्यासह असलेला, पाच मुखे तीन डोळे व दहा हात यांनी युक्त अशा श्री शंकराचे ध्यान करुन मनुष्याने श्री शिवरक्षा स्तोत्र पठन करावे.

**गंगाधरः शिर:पातु भालमर्धेन्दुशेखरः ।**
**नयने मदनध्वंसो कर्णो सर्पविभुषण: ।।३।।**

अर्थ- मस्तकावर गंगा धारण करणारा शिव माझ्या मस्तकाचे रक्षण करो, चंद्रकोर धारण करणारा शिव माझ्या कपाळाचे रक्षण करो. मदनाचा नाश करणारा शंकर माझ्या डोळ्यांचे रक्षण करो. सर्पाचे अलंकार धारण करणारा शिव माझ्या कानाचे रक्षण करो.

**घ्राणं पातु पुरारार्ति र्मुखं पातु जगत्पतिः ।**
**जिव्हां वागीश्वरः पातु कंधरं शितीकन्धरः ||४||**

अर्थ - त्रिपुराचा नाश करणारा शिव माझ्या नाकाचे रक्षण करो. जगताचा स्वामी माझ्या मुखाचे रक्षण करो. विद्येचा अधिपती माझ्या जिभेचे रक्षण करो. निळकंठ माझ्या मानेचे रक्षण करो.

**श्रीकण्ठं पातु मे कण्ठ स्कन्धौ विश्वधुरंधरः ।**
**भुजौ भूभारसंहर्ता करौ पातु पिनाकधृक ।।५।।**

अर्थ - श्रीकंठ माझ्या गळ्याचे रक्षण करो. विश्वरक्षणाची धुरा सांभाळणारा शंकर माझ्या खांद्याचे रक्षण करो. पृथ्वीचा भार सांभाळणारा शंकर माझ्या बाहूंचः रक्षण करो. हातात पिनाक धनुष्य असलेल्या शंकरा, माझ्या हातांचे रक्षण करो.

**हृदयं शंकरः पातु जठरं गिरिजापतिः ।**
**नाभिमृत्युंजयः पातु कटिव्यागाजिनांबर: ।।६।।**

अर्थ - शंकर हृदयाचे रक्षण करो, उमाकांत पोटाचे रक्षण करो, मृत्युंजय नाभिचे रक्षण करो, वाघाचे कातडे पांघरणारा शिव कटीचे (कमराचे) रक्षण करो.

**साक्विनी पातु दिनार्थ शरणागतवत्सलः ।**
**ऊरुमहेश्वरः पातु जानुनि जगदीश्वरः ।।७।।**

अर्थ - गरीब, कष्टी व शरणागत यावर दया करणारा शिव माझ्या अंगाचे रक्षण करो, महेश्वर माझ्या मांड्यांचे रक्षण करो, जगद्पति माझ्या गुढघ्याचे रक्षण करो.

**जंघें पातु जगत्कर्ता गुल्फौ पातु गणधिपः ।**
**चरणौ करुणासिंधुः सर्वांगानि सदाशिवः ॥८॥**

अर्थ - जगत्कर्ता माझ्या पोटाचे रक्षण करो, गणांचा नायक माझ्या घोट्यांचे रक्षण करो, दयासागर शिव माझ्या पायांचे रक्षण करो व सदाशिव माझ्या सर्व अवयवांचे रक्षण करो.

**एतां शिवबलोपेतां रक्षां यः सुकृति पठेत् ।**
**स भुक्त्वा सकलान्कामान् शिवसायुज्यमाप्नुयात् ।।९।।**

अर्थ - शंकराच्या सामर्थ्याने युक्त असी ही शिवरक्षा जो पुण्यवान नियमाने पठण करील, तो सगळ्या कामवासना गिळून टाकून भगवान शिवाचे सानिध्य प्राप्त करील.

**ग्रह भुत पिशाचाद्य त्रैलोक्य विचरन्तिये ।**
**दुरादाशु पलायन्ते शिवनामाभिरक्षणात् ।।१०।।**

अर्थ - अनिष्टग्रह, भूत, पिशाच्च इत्यादि जे या त्रैलोक्यांत भ्रमण करितात ते शिवनामाने होणाऱ्या रक्षणामुळे ताबडतोब पळून जातात.

**(ॐ) अभयंकर नामेदं कवचं पार्वतीपतेः ।**
**भक्त्या बिभर्तिय: कंठेतस्य वश्यं जगत्र्यम् ।।११।।**

अर्थ - अभयंकर नावाचें (अभय देणारे) हे शिवाचे कवच पाठ करील त्याला त्रैलोक्य वश होईल.

**इमां नारायणः स्वप्ने शिवरक्षांयथाऽऽविशद् ।**
**प्रातरुत्थाय योगींद्रो याज्ञवल्क्यस्तथा लिखत् ।।१२।।**

अर्थ - हे शिवरक्षास्तोत्र स्वप्नात विष्णुने जसे सांगितले तसेच योगीश्रेष्ठ याज्ञवलक्य ऋषिंनी सकाळी उठून लिहिले.

**इति श्री याज्ञवल्क्यप्रोक्तं श्री शिवरक्षास्तोत्रं संपूर्णम् ।**

अर्थ - अशा रितीने याज्ञवल्क्य ऋषिने लिहिलेले हे शिवरक्षास्तोत्र संपूर्ण, श्री सांब सदाशिवाला अर्पण असो.

## शिवषडाक्षरस्तोत्रं

**ॐकारं बिंदू संयुक्तं नित्यं ध्यायन्ति योगिन: । कामदं मोक्षदं चैव ॐकाराय नमो नमः ।।१।।**

अर्थ - बिन्दुयुक्त ॐकाराचे योगी लोक नित्य ध्यान (जप) करतात. मनोकामना पूर्ण करणाऱ्या व मोक्ष देणाऱ्या ॐ काराला नमस्कार असो.

**नमन्ति ऋषियो देवा नमन्त्यप्सरसां गणा: । नरा नमन्ति देवेशं नकाराय नमो नमः ||२||**

अर्थ - ऋषि, देव, अप्सरा, गण तसेच पुरुष हे ज्याला नमस्कार करतात अशा त्या 'न' कारास नमस्कार असो.

**महादेवं महात्मानं महाध्यानं परायण । महापाप हरं देवं मकाराय नमो नमः ||३||**

अर्थ - महादेवास, महान आत्म्याचा महाध्यानात परायण असणाऱ्या व महापापाचे हरण करणाऱ्या देवास 'म' कारास नमस्कार असो.

**शिव शान्त जगन्नाथं लोकानुग्रह कारकम् । शिवमेक पदं नित्यं शिकाराय नमो नमः ||४||**

अर्थ - मंगलकारक, शांत जगन्नाथांस, लोकांवर अनुग्रह करणारा शिव हाच एकमेव आहे. अशा त्या 'शि' कारास नमस्कार असो.

**वाहनं वृषभो यस्य वासुकिः कन्ठ भुषणम् । वामे शक्तिधरं देवं वाकाराय नमो नमः ||५||**

अर्थ - ज्याचे वाहन नंदी आहे व ज्याच्या गळ्यात वासुकी (नाग) कंठाची शोभा वाढवित आहे आणि डाव्या बाजूस पार्वती बसलेली आहे त्या अशा 'वा' कारास नमस्कार असो.

**यत्र यत्र स्थितो देव: सर्व व्यापी महेश्वरः । यो गुरुः सर्व देवांना यकाराय नमो नमः ||६||**

अर्थ - ज्या ज्या ठिकाणी देव आहेत तेथे महेश्वर सर्व व्यापी आहे. व तो सर्व देवांचा गुरु आहे. अशा त्या 'य' कारास नमस्कार असो.

**षडक्षरमिदं स्तोत्र य: पठेच्छिवसनिधौ। शिवलोकमवाप्नोति शिवेन सह मोदते ।।७।।**

अर्थ - जो हे शिवषडक्षर स्तोत्र शिवाजवळ बसुन म्हणतो तो शिवलोक मिळवतो व शिवासह आनंदात राहतो.

**इति श्री रुद्रयामले उमा महेश्वर संवादे शिवषडक्षरस्तोत्रं संपूर्णम् ।।८।।**

अर्थ - अशा प्रकारे श्री रुद्रयामलातील उमामहेश्वराच्या संवादातील शिवषडक्षर स्तोत्र संपूर्ण झाले.

## व्दादश ज्योतिर्लिङगानि

**सौराष्ट्र सोमनाथंच श्री शैले मल्लिकार्जुनम् । उज्जयिन्यां महांकालमोंकारं ममलेश्वरम् ||१||**
**केदारं हिमवत्पृष्ठे डाकिन्यां भिमाशंकरम् । वारणस्यांच विश्वेशं त्र्यंबकं गौतमीतटे ।।२।।**
**वैद्यनाथं चित्ताभूमौ नागेशं दारुकावने । सेतुबन्धेच रामेशं घृष्णेशं च शिवालये ||३||**
**व्दादशैतानि नामानि प्रातरुत्थाय य: पठेत् । सप्तजन्मकृतं पापं स्मरणेन विनश्यति ।।४।।**
**यं यं काममपक्ष्यैव पठिष्यति नरोत्तम : | तस्य तस्य फलप्राप्तिर्भविष्यति न संशयः ||५||**
**एतेषां दर्शनादेवं पातकं नैव तिष्ठति । कर्मक्षयो भवेतस्य यस्य तुष्टो महेश्वरः ।।६।।**

अर्थ - सोमनाथ, मल्लिकार्जुन, महांकाल, ममलेश्वर, वैजनाथ, भीमाशंकर, रामेश्वर, नागेश, विश्वेवर, त्र्यंबकेश्वर, केदारेश्वर व घृष्णेश्वर या शिवाच्या बारा ज्योतिर्लिंगाचे जो सकाळ सायंकाळ स्मरण करतो त्याचे सात जन्माचे पातक नाहीसे होते.

## अष्टमूर्तिशंकर

**ॐ शर्वाय क्षितिमूर्तये नमः ।। ॐ भवाय जलमूर्तये नमः ।।**
**ॐ रुद्राय अग्निमूर्तये नमः ।। ॐ उग्राय वायुमूर्तये नमः ।।**
**ॐ भीमाय आकाशमूर्तये नमः ।। ॐ पशुपतये यज्ञमानमूर्तये नमः ।।**
**ॐ महादेवाय सोममूर्तये नमः।। ॐ ईशानाय सुर्यमूर्तये नमः ।।**

## ॐ शिवपुराण ॐ

**ॐ हराय नमः । ॐ महेश्वराय नमः।।**
**ॐ शाम्भवे नमः । ॐ शूलपानये नमः ।।**
**ॐ पिनाकघृषे नमः । ॐ शिवाय नमः ।।**
**ॐ पशुपतेय नमः । ॐ महादेवाय नमः।।**

**पद्मासीनं समन्तात्स्तुतममरगणैर्विकृतिं वसानं ।**
**विश्वाद्यं विश्वबीजं निखिलभवहरं पक्ववक्त्रं त्रिनेत्रम् ।।**

अर्थ - जो पद्मासनात स्थित आहे, देवगण ज्याला चारही दिशांना उभे राहून त्याची स्तुती करता, जे वाघाची खाल घालतो, जो विश्वाचा आधीचा व उत्पत्तीचे बीज आणि सर्व प्रकारच्या भयाचे हरण करणारा आहे. ज्याला पाच मुखे आणि तीन डोळे आहे, त्या महेश्वराचे प्रत्येक दिवशी ध्यान करा.

**।। जय बाबाजी ।।** **|| जय महात्माजी॥**

---